स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेड मानव्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवी करिता सादर करण्यात आलेल्या शोध प्रबंधाचा आराखडा

"इतर मागासवर्गीय समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास"
(विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)

संशोधक

प्रा.शिवाजी बाबुराव मोहाळे
सह.प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय , लातूर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. विलास आघाव
प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख (पदवी , पदव्युत्तर)
आदर्श महाविद्यालय , हिंगोली
तथा
अध्यक्ष , राज्यशास्त्र अभ्यास मंडळ
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेड

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज . नांदेड ,

जुलै २०२१

"इतर मागासवर्गीय समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास "

(विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)

प्रस्तावना :-

भारताने स्वातंत्र्यानंतर लोकशाही शासनपध्दतीचा स्वीकार केला . भारतीय नागरीकांना समाजवाद कल्याणकारी राज्याची कल्पना व धर्मनिरपेक्षता इत्यादी बाबींची उद्देशपत्रिकेच्या माध्यमातून लेखी हमी दिली . या हमीमुळे एकूण भारतीय समाजाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल , असे चित्र स्पष्ट झाले . असे असले तरी लोकशाही शासनपध्दती भारतीय समाजाच्या दृष्टीने नवीन होती . त्यामुळे या शासनपध्दतीचे नागरीकांना व्यापक स्वरुपात प्रशिक्षण देणे आवश्यक होते . कारण त्या शिवाय देशातील लोकशाही यशस्वी होऊ शकत नव्हती नागरीकांना लोकशाहीचे राजकीय प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने नागरीकांनी जास्तीत जास्त प्रमाणात राजकीय प्रक्रियेत सहभाग वाढविणे आवश्यक होते . अशा वाढीव सहभागाशिवाय लोकशाही प्रक्रिया दृढमूल होऊ शकत नाही . लोकशाही शासन प्रणालीमध्ये विविध प्रकारच्या राजकीय संस्थामार्फत अनेक प्रकारचे निर्णय घेतले जात असतात . हे सर्व निर्णय घेण्याच्या कामात नागरीकांचा सहभाग व समंती आवश्यक आसते . जर नागरीकांच्या समती शिवाय शासन केल्यास त्या शासनस लोकशाही म्हणता येत नाही . म्हणून लोकशाही मध्ये नागरीकांच्या सहभागास अतिशय महत्व असते . राजकीय सहभागामुळे देशातील विविध समस्यांची देखील सोडवणूक होते .

भारतीय संविधानाने पंचायतराज व्यवस्था हा विषय राज्यसूचीत समाविष्ट केला आहे . संविधानात्मक तरतूदीनुसार तो राज्य सरकारच्या अधिकारातील विषय आहे. या अधिकारानुसार राज्य शासनाने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची जी व्यवस्था प्रस्थापित केली आहे . त्या व्यवस्थेला पंचायतराज असे संबोधले जाते . पंचायतराजची निर्मिती सामाजिक पुनर्रचना व सत्तेच्या विकेंद्रीकरणातून समाजोपयोगी कामासाठी करण्यात आली होती . तसेच पंचायत राजच्या माध्यमातून ग्रामीण समाजाला स्वायत्त व स्वावलंबी करणे , विविध स्तरावर सत्तेचे

विकेंद्रीकरण करून त्यांना राजकीय सहभाग मिळवून देण्याचाही उद्देश होता , त्यासाठी पंचवार्षिक योजना , समाज विकास योजना राष्ट्रीय विस्तार सेवा कार्यक्रम हाती घेतले भारतीय ग्रामीण जनतेला लोकशाहीचा अनुभव नसल्यामुळे तसेच स्वातंत्र्यानंतर राजकीय व सामाजिक प्रबोधनाचा अभाव असल्यामुळे या योजना यशस्वी होवू शकल्या नाहीत .

केंद्र शासनाने समाज विकास योजना व राष्ट्रीय विस्तार सेवा अयशस्वी का झाले याचा अभ्यास करून बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली १६ जानेवारी १९७५ रोजी एका समितीची नियुक्ती केली . पंचायतराज निर्मितीच्या दृष्टीने ही घटना ऐतिहासिक ठरली . कारण मेहता समितीच्या शिफारशीनी देशाच्या पंचायतराजचा व्यवस्थेचा पाया घातलेला आहे . या समितीने ग्रामीण विकास व पुनर्रचनेसाठी गाव तालुका व जिल्हा स्तरावर सत्तेचे विकेंद्रीकरण करून लोकांना राजकीय निर्णय प्रक्रियेत सामावुन घेण्याची शिफारस केली होती . तसेच या संस्थाना पुरेसे अर्थसाहाय्य देण्याचे सुचविले होते . भारत सरकारने या शिफारशी मान्य करून सर्व राज्यांना लोकनियुक्त संस्थाची स्थापना करून सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने सुचविले हे राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण म्हणजेच पं. नेहरूच्या मते पंचायतराज होय .

देशातील विविध राज्यांनी आपली स्थानिक परिस्थीती विचारात घेवून मेहता समितीच्या शिफारशीत फेरफार करून स्थानिक संस्थाची निर्मिती केली महाराष्ट्राने मेहता समितीच्या सत्तेच्या विकेंद्रीकरणा संदर्भातील शिफारशीची अंमलबजावणी कशा पध्दीतने करता येईल यासाठी २७ जून १९६० रोजी वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली या समितीने बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशी राज्याच्या संदर्भात विचारात घेवून आपला अहवाल तयार केला . या अहवालात पंचायतराज निर्मितीबाबत २२६ शिफारशी करण्यात आल्या होत्या . महाराष्ट्र शासनाने वसंतराव नाईक समितीच्या बहुसंख्य शिफारशी स्वीकारल्या . त्या शिफारशीवर आधारीत शासनाने 'महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१' तयार केला . या अधिनियमानुसार राज्यातील पंचायतराजची मुलभूत संरचना अस्तित्वात आली आहे .

ग्रामीण भागातील सत्तेचे विकेंद्रकरण आणि पचायतराज व्यवस्था मजबूत करण्यासाठी भारत सरकारने १९९२ मध्ये ७३ वी घटना दुरुस्ती केली . त्यानुसार इतर मागासवर्गीय समाजाला २७ टक्के जागा आरक्षीत केल्या . तसेच पचायतराज संस्थेतील अध्यक्ष , सभापती व सरपंचपदांना आरक्षण लागू करण्यात आले . कारण या पदांवर घटनादुरुस्ती पूर्वी विशिष्ट समाजाचीच मक्तेदारी असायची . समाजातील दुर्बल घटकांना कोणतेही पद दिले जायचे नाही . त्यामुळे इतर मागासवर्गीय समाजाचे प्रश्न सोडवणे कठीण जायचे या घटनादुरुस्तीमुळे काही पदे राखीव ठेवण्यात आली . राखीव जागेच्या तरतूदीमुळे इतर मागासवर्गीय समाजाचा विकास होण्यास मोठी मदत झाली इतर मागासवर्गीय समाजाला राज्यकारभारात सहभागी होण्याची व त्यांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली . त्यामुळे इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधींची राजकीय जागृती होऊन त्यांच्यात नवा आत्मविश्वास निर्माण होत आहे .

संशोधन विषयाचे महत्त्व :-

'इतर मागासवर्गीय समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास,विशेष संदर्भ लातूर : जिल्हा' या विषयाच्या अनुषंगाने एक बाब लक्षात घेणे आवश्यक आहे की भारतातील चातुवर्ण्य व्यवस्थेमुळे मागासवर्गाना राजकीय , आर्थिक , सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात पुरेसे प्रतिनिधीत्व व सहभाग मिळाला नाही . ऊलट त्यांना असमानतेची वर्तणूक मिळाली . त्यामुळे त्याच्या विकासात विविध अडथळे निर्माण झाले . ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन सत्ता ही समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचत आहे . राखीव जागेच्या तरतूदीमुळे इतर मागासवर्गीय समाजाला राज्यकारभारात सहभागी होण्याची व निर्णय घेण्याची संधी प्राप्त झाली .

७३ व्या घटना दुरुस्तीने लागू केलेल्या आरक्षणाची अमलंबजावणी त्या त्या प्रवर्गानुसार कितपत होते ? विशेषतः इतर मागासवर्गीय समाजातील आरक्षणातून आलेल्या प्रतिनिधींचा राजकीय सहभाग संख्यात्मकते बरोबरच तो गुणात्मक आहे का ? या प्रवर्गातील प्रतिनिधींच्या अंगी सक्षम नेतृत्वाचे गुण विकसीत होतात का ? हे जाणून घेण्याकरीता संशोधण होणे आवश्यक आहे. तसेच राज्य विधीमंडळ आणि संसदेमध्ये इतर मागासवर्गीय समाजाला

आरक्षण देण्याची मागणी कितपत सुयोग्य आहे . इतर मागासवर्गीय समाजातील जातींची जनगणना करणे संयुक्तीक ठरेल का ? अशा विविधांगी प्रश्नाची उकल प्रस्तुत संशोधनातून स्पष्ट करण्यासाठी ' "इतर मागासवर्गीय समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास ",विशेष संदर्भ : लातूर जिल्हा हा विषय मी निवडला आहे .

समस्या सुत्रण :-

'इतर मागासवर्गीय समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास,विशेष संदर्भ : लातूर जिल्हा' या विषयावर माडणी करताना असे दिसून येते की ७३ व्या घटना दुरूस्तीमुळे लोकशाही प्रक्रीया गतीमान होऊन इतर मागासवर्गीय समाजाचा राजकीय सहभाग वाढला . त्याच्यात राजकीय जागृती निर्माण होऊन आत्मविश्वास वाढला व त्यांना प्रतिनिधी म्हणुन काम करण्याची संधी प्राप्त झाली . या जाणिवेतूनच राज्य विधिमंडळ व संसदेत आरक्षणाची मागणी जोर धरू लागली आहे . तसेच इतर मागासवर्गीय समाजातील जातींची जणगननेसाठीची मागणी कितपत योग्य आहे . याचा एक संशोधनात्मक आढावा घेतला आहे .

७३ व्या घटनादुरुस्तीतील इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणाच्या अमंलबजावणीमुळे इतर मागासवर्गीय समाजाच्या सामाजिक , राजकीय व आर्थिक स्थितीती काय परिणाम झाला . हे पाहण्यासाठी इतर मागासवर्गीय समाजाच्या राजकीय सहभागचा आभ्यास केला जाणार आहे . त्यामध्ये आरक्षणामुळे इतर मागासवर्गीय समाजाचा राजकीय सहभाग वाढला का ? पंचायतराज संस्थेत इतर मागासवर्गीय समाजाचे आरक्षण आवश्यक होते का ? आरक्षणामुळे या समाजात राजकीय जाणिवा निर्माण झाल्या का ? आरक्षणाचा राजकारणात किती टक्के लाभ मिळाला, या सर्व प्रश्नांची उकल करण्यासाठी अध्ययन केले जाणार आहे .

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

'इतर मागासवर्गीय समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास,विशेष संदर्भ : लातूर जिल्हा' या विषयातील संशोधनाचे अध्ययन करताना पंचायतराज संस्थेतील आरक्षणाच्या तरतुदीमुळे इतर मागासवर्गीय समाजाला राजकारणात सहभागी होण्याची व निर्णय घेण्याची संधी प्राप्त झाली . ७३ व्या घटनादुरूस्ती पूर्वी विशिष्ट वर्गाचीच मक्तेदारी होती . त्यांनी इतर मागास वर्गीय समाजाला राजकीय सत्तेतील न्यायवाट्यापासून दूर ठेवले . आरक्षणामुळे इतर मागासवर्गीय समाजात स्वतःच्या हक्क व न्यायासाठी संघर्ष करण्याची क्षमता वाढली . आपण कोणतेही प्रतिष्ठित पद प्राप्त करू शकतो असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला .

प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील पंचायतराज संस्थाच्या संदर्भात असून वेळ आणि परिश्रमाची मर्यादा लक्षात घेता संदर्भिय अध्ययनासाठी लातूर जिल्हयातील पंचायतराज संस्थेतील इतर मागासवर्गीय समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास केला जाणार आहे .

प्रस्तुत संशोधण करत असताना सर्वच माहिती मिळेल असे निश्चितपणे सांगता येत नाही , माझ्या प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंघाने सांख्यकीय आकडेवारी पूणत मीळेलच असे नाही . त्याच बरोबर महाराष्ट्रातील सर्व जिल्हे व जिल्हयातील इतर मागासवर्गीय समाजातील सर्वच प्रतिनिधींच्या राजकीय सहभागाचा अभ्यास करणे शक्य होणार नाही . ही माझ्या संशोधनाची मर्यादा आहे . म्हणून माझ्या संशोधनाचे अभ्यासाचे क्षेत्र लातूर जिल्हयापुरते मर्यादीत आहे .

संशोधनाचे उद्दीष्टे:-

'इतर मागासवर्गीय समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास,विशेष संदर्भ : लातूर जिल्हा' या विषयातील संशोधन सर्वव्यापी करण्यासाठी संशोधन विषयाचे खालील उद्दीष्टे मांडण्यात आलेली आहेत .

१: इतर मागासवर्गीय समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे .

२: पंचायतराज संस्थेची संविधानिक व कायदेशीर माहिती इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधींना आहे का ? हे जाणून घेणे .

३: इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधींचे स्थान , दर्जा , भूमिका व प्रशासनातील अडथळे अभ्यासणे .

४: इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधींना असणाऱ्या राजकीय जाणिवांचा अभ्यास करणे ,

५: इतर मागासवर्गीय समाजातील विविध जातींना सत्तेचा न्याय वाटा मिळालेला आहे का ? ते अभ्यासणे

६: इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधींचा राजकीय सहभाग व त्यांच्या कार्याचा अभ्यास करणे .

७: संसद व राज्य विधीमंडळातील आरक्षणाच्या आवश्यकते बाबतची इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधींची मते जाणून घेणे .

संशोधनाची गृहितकृत्ये :-

१ : इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधींचा निर्णय पक्रीयेतील क्रियाशील सहभागाचा अभाव दिसून येतो .

२ : इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधीत सक्षम नेतृत्वाचे गुण कमी प्रमाणात दिसूण येतात .

३ : इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधींना घटनात्मक व कायदेविषयक आधिकाराची जाणीव नसल्याचे दिसते .

४. आरक्षणामुळे इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधीचा सामाजिक आर्थिक दर्जा सुधारत असल्याचा दिसतो .

५ संसद व राज्य विधीमंडळातील इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणाची मागणी ही पंचायतराज मधील आरक्षणाचा पाया समजल्या जाते .

संशोधन पध्दती :-

'इतर मागासवर्गीय समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास,विशेष संदर्भ : लातूर जिल्हा' या शीर्षकांतर्गत निवडलेल्या प्रबंधाची मांडणी करण्यासाठी संशोधनात सामाजिक शास्त्रे या विद्याशाखे अंतर्गत वापरण्यात येत असलेल्या अध्ययन पद्धतीचा अवलंब केला आहे .

प्रस्तुत अध्ययन विवेचनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीवर अधिष्टित आहे . आरक्षणामुळे इतर मागासवर्गीय समाजाला राजकीय सत्तेत सहभागी होण्याची व नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाली. आरक्षणाची जाणीव जागृती, राजकारणातील पार्श्वभूमी , क्रियाशील राजकीय सहभाग व त्यातील समस्या संख्यात्मक सहभागाबरोबरच गुणात्मक सहभागाच्या स्वरूपाचे विश्लेषण करून सक्षम नेतृवाचा निर्णय प्रकीयेतील सहभागाचे अनुभवजन्य विश्लेषण करण्यात येणार आहे .

संशोधन पध्दतीत साहित्य संकलन हा महत्वाचा भाग असतो प्रस्तुत अध्ययन करण्यासाठी प्राथमिक तसेच द्वितीय स्त्रोतांच्या आधारे साहित्य संकलन करण्यात येणार आहे .

नमूना निवड :-

प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रपातळीवर असले तरी नमूना निवड म्हणून पंचायतराज संस्थेतील इतर मागासवर्गीय समाजातील लोकप्रतिनिधींचा राजकीय सत्तेतील सहभागाचा विशेष अभ्यास करण्यात येणार आहे . संशोधनासाठी निवडलेल्या लातूर जिल्हातील जिल्हापरीषद , पंचायत समीत्या व ग्रामपंचायतीतील इतर मागासवर्गीय समाजातील निर्वाचीत लोकप्रतिनिधी व पदाधिकारी यांच्या प्रश्नावलीच्या अधारे मुलाखती घेवून व प्रत्यक्ष निरीक्षण करून उपलब्ध झालेल्या माहितीचे संकलन व विश्लेषण करण्यात येणार आहे .

प्रकरणाची रचना :-

'इतर मागासवर्गीय समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास,विशेष संदर्भ : लातूर जिल्हा'' या शीर्षकांतर्गत निवडलेल्या प्रस्तुत प्रबंधाची मांडणी पुढील पाच प्रकरणात करण्यात येणार आहे .

१. प्रस्तावना:-

प्रस्तुत प्रकरणात विषय प्रवेशासह समस्येची मांडणी करून संशोधन अधिकाधीक शास्त्रीय होण्यासाठी विशिष्ट अशा संशोधन पध्दतीचा अवलंब केला जाईल . त्यासाठी काही उद्दिष्टे व गृहितकृत्ये निश्चित करून प्रकरण निहाय मांडणी करण्यात येईल . इतर मागासवर्गीय समाजाची सामाजिक , शैक्षणिक व आर्थिक स्थितीची पार्श्वभूमी तसेच इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षण विषयक धोरणाची पार्श्वभूमी , स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील परिस्थितीची मांडणी करून घटनात्मक विकासाचा आढावा घेतला आहे .

२. लातूर जिल्हा : एक दृष्टिक्षेप :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये लातूर जिल्ह्याची तोड ओळख करून दिली आहे व त्यासाठी नकाशांचा पर्याप्त वापर केला आहे .

३. महाराष्ट्रातील पचांयतराज व्यवस्था व ओबीसी लोकप्रतिनिधींचा सहभाग :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्राचीन काळातील पंचायतराज व्यवस्था , महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्था व त्याची वैशिष्ट्ये , जिल्हा परिषद , पंचायत समिती व ग्राम पंचायत इ . बाबत माहिती दिली आहे . तसेच ७३ व्या घटनादुरुस्तीची आवश्यकता का भासली ? ७३ व्या घटनादुरुस्तीतील तरतुदी , विविध समित्या व त्यांनी केलेल्या शिफारशी , ७३ व्या घटनादुरुस्तीची वैशिष्ट्ये व इतर मागासवर्गीय समाजाला दिलेले २७ टक्के आरक्षण या बाबींचा उल्लेख केलेला आहे . इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधींचा राजकीय सहभाग , पंचायतराज संस्थेतील इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणाची आवश्यकता व आरक्षणोत्तर स्थितीचा आढावा घेतला आहे .

४. इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधींच्या राजकीय सहभागाचे अनुभवजन्य विश्लेषण :-

या प्रकरणामध्ये लातूर जिल्हापरिषदेच्या निवडणूका , इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधींचा निर्णय प्रक्रियेमधील सहभाग व विकासकार्य इ . ची माहिती दिलेली आहे . तसेच इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधींच्या मुलाखती घेवून अनेक बाबींची वस्तूनिष्ठ माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला आहे .

५. निष्कर्ष व शिफारसी :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनात बाळगलेल्या उद्दिष्टांना अनुसरून इतर मागासवर्गीय समाजातील प्रतिनिधींच्या निर्णय प्रक्रियेतील सहभाग व कार्याचे मूल्यमापन केले जाईल . तसेच संशोधन स्वीकारलेल्या गृहितकृत्यांची पडताळणी करून काही निष्कर्ष काढण्यात येतील तसेच इतर मागासवर्गीय समाजाच्या सामाजिक , आर्थिक शैक्षणिक व राजकीय प्रश्नावर काही उपाय योजना सूचविल्या जाणार आहेत .

संशोधक **मार्गदर्शक**

प्रा. शिवाजी बाबुराव मोहाळे **प्रा. डॉ. विलास बाबुराव आघाव**

संदर्भ ग्रंथसूची :-

१ . 'भारतीय संविधान ' महाराष्ट्र राज्य व भारत सरकारच्या वतीने मुद्रीत व प्रकाशीत १९९६

२. 'लोकशाही विकेंद्रीकरण समितीचा अहवाल ', भारत सरकार द्वारा मुद्रीत १९५७

३ . '७३ वी घटनादुरुस्ती कायदा ' भारतीय सामान्य प्रशासकीय विभाग, भारतसरकार द्वारा मुद्रीत १९९३

४. 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती ॲक्ट १९६१

५. शांताराम भोगले , ' भारतीय स्थानिक शासन विद्या प्रकाशन नागपूर १९९०

६. के. आर. बंग , ' भारतीय प्रशासन ' कैलास पब्लीकेशन , औरंगाबाद १९९९ .

७. घांगरेकर चि . घ . महाराष्ट्राचे प्रशासन विद्या प्रकाशन , नागपूर १९९९

८. नागोराव कुंभार , आरक्षण का व कसे ?, प्रबोधन प्रकाशन , २००७ .

९. नागोराव कुंभार , मंडल आयोग विशेषांक ' , प्रबोधन प्रकाशन १९९९

१०.नागोराव कुंभार , (संपा) ' बहुजन महासंघ विशेषांक " , प्रबोधन प्रकाशन , १९९३

११. सुहास पळशीकर , ' जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण ' , सुगावा प्रकाशन , सप्टेबर १९९८

१२. सुहास कुलकर्णी, ' मंडल आयोग आणि लोकसभा उमेदवारीचे वाटपः महाराष्ट्र, समाज प्रबोधन प्रतीका वर्ष २८ अंक ११६ जुलै - सप्टे , १९९१

१३. रामनाथ चव्हाण , ' जाती आणी जमाती , मेहता पब्लिशिंग हाउस , पुणे १९९०

१४. सुहास पळशीकर , राखीव जागा सत्तेसाठी न्यायासाठी मिळून साच्या जनी , ऑगस्ट २००६

१५. अशोक शर्मा , ' भारत मेसीनीय शासन , उपकार प्रकाशन , आग्रा २०००

१६. गोविंद यमलवाड , ' स्थानिक स्वराज्य संस्था , कल्पना प्रकाशन , नांदेड २००१.

१७. पाटील वा. ब. ' विकासाचे प्रशासन ' , विद्याप्रकाशन नागपूर १९९९

१८. कोतापल्ले , ' महाराष्ट्र प्रशासन कल्पना प्रकाशन , नांदेड १९९७

१९. अशोक कुमार , ' राजनीती विज्ञान ' , उपकार प्रकाशन , आगरा २००२ .

२०. श्रीकांत देशपांडे , ' भारताचे संविधान विकास , स्वरूप व राजकारण ' मंगेश प्रकाशन नागपूर १९९३